**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1748/2007.**

श्री महेन्द्र रामकृष्णराव शेंडे
दयाल नगर चंदन एस टी डी जवळ,
मेन देवळी रोड पो. वर्धा गंज ता.जि.वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डि. एस. चिलमुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा. प्र.) तथा अपीलीय अधिकारी,
नगर पालिका प्रशासन, आयुक्त कार्यालय, नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगर परिषद पुलगांव
ता. देवळी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.7.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. माहिती अधिकारी गैरहजर आहेत. त्यांचे ऐवजी वरिष्ठ लिपीक हजर आहेत. जन माहिती अधिकारी हे वैद्यकीय रजेवर आहेत असे वरिष्ठ लिपीक यांनी सांगितले.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.11.2006 रोजी कै. रामकृष्णरात मारोती शेंडे यांचे मृत्यु प्रमाणपत्र दि. 4.8.2006 मुख्याधिकारी तथा जन माहिती अधिकारी नगर परिषद पुलगांव यांचेकडे अपीलकर्ता यांनी मागितलेले दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 20.12.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19.1.2007 रोजी देण्यात आलेला असून ''अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रतिवादी माहिती अधिकारी नगर परिषद पुलगांव यांनी विहित मुदतीत न दिल्याची दखल घेण्यात येते. अपीलार्थी यांनी दि. 5.1.2007 ला देण्यात आलेल्या मृत्यु प्रमाणपत्राचे खरेखोटेपणाबद्यल समक्ष कार्यालय प्रमुख त्यांचे नियंत्रण अधिकारी यांचेकडे दाद मागावी. अपिलार्थी यांना माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत दंडात्मक कार्यवाहीसाठी द्वितीय अपील प्राधिकारी मा. राज्य माहिती आयुक्त नागपूर/अमरावती विभाग कार्यालय रवी भवन रुम नं. 8 नागपूर येथे अपील करता येईल'' असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरचा निर्णय हा स्वयंस्पष्ट असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे दोषी आढळुन येतात. सहा. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की सदरचे माहितीच्या अर्जार्जाचे प्रकरण हे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचेपर्यंत कार्यालयातील संबंधित कर्मचा–यानी निदर्शनास आणले नाही. अर्थात त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा हा आयोगापुढे सादर करण्यात आलेला नाही. तसे जरी असले तरी हे संबंधित अधिकारी, कर्मचारी असतील व ज्यांचे सहाय्य जन माहिती अधिकारी यांना घ्यावे लागते असे अधिकारी किंवा कर्मचारी यांना सुध्दा अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते. व त्यामुळे संबंधित अधिकारी व कर्मचारी हे सुध्दा

तेवढयाच प्रमाणात दोषी आढळुन येतात व त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी किंवा संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांचेविरुध्द शास्ती लादण्याच्या पुर्वी परंतुकाप्रमाणे त्यांचे म्हणणे एकुन घेणे बंधनकारक असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय वर नमुद केल्याप्रमाणे स्वयंस्पष्ट असल्यामुळे त्याबाबत आवश्यकता आढळुन येत नाही. व तसेही नोटिस काढून मुख्याधिकारी तथा माहिती अधिकारी हे गैरहजरच आहेत. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द शास्ती लादण्याच्या करीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी व त्यांना ज्यांचे ज्यांचे सहाय्य घ्यावयाचे असे अधिकारी किंवा कर्मचारी यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे माहिती अधिकारी समजून कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची वसुली प्रादेशिक संचालक नगर पालिका प्रशासन यांनी संबंधिताच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करुन ती लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये भरणा करावा.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रादेशिक संचालक नगर पालिका प्रशासन आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी. 3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 14.7.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.